कौटुंबिक हिंसा - एक आरोग्यसेवेचा प्रश्न

रुग्णालयातील आरोग्य सेवकांसाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम

संकलन : प्रशिक्षक कोअ्र ग्रुप,

के.बी. भाभा रुग्णालय, वांद्रे (पश्चिम).

दिलासा-स्त्री अत्याचार निवारण केंद्र

के.बी. भाभा रुग्णालय आणि सेहंत यांच्या संयुक्त विद्यमाने

कौटुंबिक हिंसा - एक आरोग्यसेवेचा प्रश्न

दिलासा-स्त्री अत्याचार निवारण केंद्र
के.बी. भाभा रुग्णालय,
वांद्रे (प.), मुंबई.

सेहत

सेंटर फॉर इनक्वायरी इनटू हेल्थ अँड अलाईड थीम्स
मुंबई.

प्रशिक्षक कोअर ग्रुप:

- भारती बापट - ग्रंथपाल
- जोत्सना अंबेकर - भौतिक उपचारक
- मीनल सुळे - वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ
- पल्लवी चिपळूणकर - डॉक्टर
- सरस्वती खाडे - परीसेविका
- शार्दुला सरनोबत - व्यवसाय उपचारक
- शर्मिला घरत - नोंदणी सहाय्यक
- शोभा गोरे - परीसेविका
- सुलभा चिरमुले - डॉक्टर
- सुमन गायकवाड - अधिसेविका
- उषा शेलार - डॉक्टर
- विकास घरत - वैद्यकीय अभिलेखा अधिकारी

आभार :

हा अभ्यासक्रम वांद्रे येथील के.बी. भाभा रुग्णालयाच्या प्रशिक्षकांनी विकसित केला आहे. मीनल सुळे व दिलासा टीमने ह्या अभ्यासक्रमाला लिखित स्वरुप दिले. हा अभ्यासक्रम रुग्णालयाच्या स्टाफच्या पंचवीसपेक्षा जास्त गटांना प्रशिक्षित करण्यासाठी राबविण्यात आला.

हा अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी मनीषा गुप्ते यांनी मार्गदर्शन केल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

अनुवाद - अरुणा बुरटे

दिलासा टिम:

- डॉ. सीमा मलिक - प्रकल्प संचालक
- पद्मा देवस्थळी - प्रकल्प संयोजक
- संगीता रेगे - समाजसेविका
- चित्रा जोशी - समाजसेविका
- चंद्रा राममूर्ती - समुपदेशक
- प्रमिला नाईक - सेक्रेटरी

कौटुंबिक हिंसा - एक आरोग्यसेवेचा प्रश्न

वेळ: दुपारी १२.०० ते ४.००

उद्देश:

- कौटुंबिक हिंसा हा आरोग्याचा प्रश्न आहे. या बद्दल जागरुकता निर्माण करणे.
- कौटुंबिक हिंसा सहन करणा–या रुग्णांबाबत संवेदनशीलता वाढवणे.
- दिलासा प्रकल्प रुग्णसेवेचा एक भाग आहे, हा विचार रुग्णालयात रुजवणे.

प्रशिक्षणासाठी काही पूर्वसूचना:

1. प्रशिक्षणातील कृती कार्यक्रमात आधी कागद, पेन असे आवश्यक साहित्य द्यावे.
2. बसण्याच्या व्यवस्थेमध्ये प्रशिक्षणार्थींच्या रुग्णालयातील अधिकार पदांची सरमिसळ करावी.
3. साधारण गोलाकरात बसावे.
4. सहभागींची मते खोडण्याऐवजी वेगळा दृष्टीकोन मांडावा, त्यावर विचार करण्यास सांगावे.
5. उत्तरे थोडक्यात द्यावीत, एकाच मुद्दयात अडकू नये.
6. श्रोत्यांकडे पाहात बोलावे, सर्वांना बोलते करावे, कमी बोलणा–यांकडे विशेष लक्ष द्यावे.
7. जागा, आवश्यक साहित्य व अल्पोपहार याची व्यवस्था पुरेशी आधी करावी.

भाग एक :

ओळख व प्रास्तविक:

सर्व प्रथम ओळखीची फेरी घ्यावी. त्यात नाव, हुद्दा, विभाग, नोकरीची वर्ष असे तपशील असावेत, तसेच, प्रत्येकाला स्वतःचा एक विशेष गुण नमूद करायला सांगावा, यास साधारण 15 मिनीटे लागतील. या गटाची जमेची बाजु म्हणून सहभागींचे गुण सांगावेत, त्यांचा चपखल उपयोग आजच्या सत्रासाठी करुन घ्यावा.

हे प्रशिक्षण दिलासातर्फे घेतले जात आहे याची कल्पना नसल्याने दिलासाची थोडक्यात ओळख करुन द्यावी. कौटुंबिक 'हिंसेला' तोंड द्यावे लागणाऱ्यांना मदत देण्यासाठी दिलासाची नव्याने सुरवात झाली, अपघात विभागासमोर व सर्जिकल विभागाच्या बाजुला दिलासा विभाग क्रमांक 101 आहे.

शारीरिक व मानसिक व्याधींवर ईलाज करण्यासाठी महिला दवाखान्यात येतात. या व्याधींचे मूळ बऱ्याच वेळा कुटुंबात होणाऱ्या हिंसेत असते. महिला अपघात / बाहयरुग्ण विभागात आपल्या संपर्कात येतात. ईलाज करण्याच्या कालावधीत जर आपणाला हिंसेचा मागोवा लागला, तर आपण तिला मदत करु शकतो.

दवाखान्यात घडणारे काही प्रसंग पहा .....

1. गेले दहा दिवस सतत येणाऱ्या तापाची तक्रार घेउन एक महिला रात्रीच्यावेळी अपघात विभागात येते, डॉक्टरांची प्रतिक्रिया

   'दस दिन से बुखार है अब तक क्या सोई थी?'

2. वेळ संपल्यावर नोंदणीसाठी रुग्ण येते, तेथील कर्मचारी म्हणते

   'डॉक्टर का घर समझता है।'

3. मेडिकल ओपीडीत सततच्या डोके व अंग दुखीची तक्रार घेउन महिला येते, डॉक्टर म्हणतात

   'बार बार गोली खाने की आदत पड़ गई है वहम हो गया है PSY में भेज देता है।'

4. लेबर वॉर्डमध्ये नेहमीचा प्रसंग, प्रसूत होणारी बाई कळा सहन न झाल्याने आरडा ओरडा करते. तेथील सिस्टर किंवा आयाबाई म्हणतात

   'तब मजा आया ना अब क्यो चिल्लाती है, चिल्लाओं मत तू क्या तेरा बच्चा मर जाएगा।'

5. रुग्ण औषधे घेण्यासाठी औषध विभागात गेली आहे. हाताला जखम झालेली असल्याने औषधं कशी घ्यायची हे तिच्या लक्षात येत नाही. तेंव्हा जवळील व्यक्ती म्हणते

'समझता नही क्या PSY *में जाकर दिमाग का तपास कर लो।'*

हे सर्व नेहमी घडणारे प्रसंग आहेत, आपणही काही उदाहरणे देउ शकाल, या सर्व उदाहरणांमध्ये काय दिसते? यामध्ये तुम्हाला हिंसा होत आहे, असे वाटते का ?

कोणतीही रुग्ण जेव्हा दवाखान्यात कोणाकडेही– जसे स्टाफ, नोंदणी मदतनीस, डॉक्टर, नर्स, वॉर्ड बॉईज, आयाबाई, औषध विभाग कर्मचारी – येते तेव्हा ती त्यांच्या मदतीची अपेक्षा करते. तिला उपचारांची आणि आधाराची गरज असते. ती गरजू असल्याने प्रतिप्रश्न विचारू शकत नाही. उलटही बोलू शकत नाही. आपण एक गोष्ट ठाम लक्षात ठेवायला हवी, आपण उपचारकर्ते आहोत. सेवा देण्यासाठी बांधील आहोत, आपल्या खाजगी आयुष्यातील ताण बाजुला ठेवता यायला पाहीजेत. आपण सार्वजनिक दवाखान्यातील सेवा देणारे सेवक आहोत. आपल्या नोकरीचा भाग म्हणून आपण ही सेवा देण्यासाठी वचनबध्द आहोत. ही सेवा मिळणे हा रुग्णाचा प्राथमिक हक्क आहे. आपण थोडेसे जरी उध्दट झालो, तरी या मूलभूत अधिकाराची पायमल्ली होते, अशा पध्दतीने दिलेली सेवा ही अपुरी ठरते. कारण रुग्ण एकतर गप्प बसते, मदत मागणं थांबवते, किंवा मोकळेपणाने अडचणी सांगत नाही. असे झाले तर, कौटुंबिक हिंसेसारख्या खाजगी दुःखाला वाचा कशी फोडता येईल? हिंसेपासून तिचे संरक्षण करण्याचे उपाय कसे करता येतील? रुग्णला उपचारकर्त्याबद्दल निर्धास्त वाटल्यावरच ते शक्य होईल.

या सर्व उदाहरणांमध्ये उपचारकर्ते अधिकाराच्या पदावर आहेत, रुग्ण नडलेली आहे, गरजू आहे, अधिकार, पद, सत्ता, असणारे कमकुवत, गरजू व्यक्तीवर तो गाजवू शकतात, कारण गरजू कधिच प्रतिकार करणार नाही, हे माहीत असते. या उदाहरणामध्ये हिंसा शाब्दिक होती. आपण या हिंसेची व्याख्या करु शकू का?

त्यासाठी हिंसा म्हणजे काय, हा प्रश्न करावा, सर्वांना मत मांडायला सांगावे. दुर्बलांवर बळाचा पध्दतशीर वापर जेव्हा प्रबळ करतात, तेव्हा हिंसा घडते, दुर्बलांना नेस्तनाबूत, गप्प करण्यासाठी, त्यांच्यावर पूर्ण ताबा ठेवण्यासाठी बळाचा वापर होतो, हिंसेचा वापर अपमानित करण्यासाठी, दुखावण्यासाठी केला जातो, ज्याचा अपमान होतो, ती व्यक्ती आत्मविश्वास गमावते, अगतिक होते, एकाकी होते, हिंसा मर्मावरच घाव घालते, कांही वेळा गरजू व्यक्ती एवढी एकाकी होते, की ती हिंसेचे कारण स्वतःलाच दोषी ठरवून शोधू पाहाते. ती स्वतःचा व्देष करु लागते. ज्यांचा छळ होतो, त्यांची हीच अवस्था होते, घरात होणाऱ्या छळाचे सुध्दा हेच परिणाम होतात.

भाग दोन :

कृती सत्रासाठी सूचना:

1, 2, 3 असे अंक म्हणून छोटे तीन गट करावे, प्रत्येक गटाला चर्चेसाठी एक केस द्यावी. एकाने गटासाठी केस वाचून दाखवावी. चर्चेला दिशा देण्यासाठी काही मुद्दे सूचीत करावेत. गटांना पुढील सूचना द्याव्यात : गटामध्ये सर्वांनी आपली मतं मांडावीत, एकाने ती नोंदत जावीत. गटप्रतीनीधीने मोठया गटात चर्चेचा सारांश मांडावा.

प्रत्येक गटाने खालील दोन मुददयांचा उल्लेख जरुर करावा –

1. आपल्या केसमधे हिंसाच्या प्रकारांची यादी तयार करावी.
2. हिंसा कोणी कोणावर केली ? – यासाठी वेळ 15 मिनीटे ठेवावा.

प्रसंग १

सुनील खूप हुशार आणि तडफदार माणूस आहे. एक दिवशी कोणतेही कारण नसताना बॉसने त्याला झापलं खर तर बॉस नेहमी चांगला वागतो पण त्या दिवशी मात्र तो खूप लोकांसमोर सुनीलला बोलला.

सुनील त्यामुळे खूप नरवस झाला व कामाकडे लक्ष देवू शकला नाही. संध्याकाळी घरी जाताना पास संपल्याचे त्याच्या लक्षात आले व तो भल्यामोठ्या पासाच्या रांगेत उभा राहिला. त्याचा नंबर आल्यावर त्याला सुटे पैसे मागितले गेले, ते त्याच्या जवळ नव्हते. त्यामुळे खिडकीतला माणूस त्याच्यावर ओरडला आणि त्याला सुटे पैसे मिळेपर्यंत बाजूला उभे राहायला सांगितले. सुनीलचा खूप अपमान झाला पण तो काहीच करु शकत नव्हता. त्याने स्टॉल वरुन सुटे पैसे घेतले आणि पुन्हा रांगेत उभा राहिला. घरी गेल्यावर बायको घरी नसल्याने त्याला स्वतःच चहा करुन घ्यावा लागला. बायको आल्यावर तिच्यावर चिडला व त्याने तिला थप्पड मारली.

हा प्रकार बघून मुलं गुपचूप कोप–यात उभी राहिली. घडल्याप्रकारामुळे आई नाराज होती आणि ती जेवलीच नाही. जेवण झाल्यानंतर आई मुलांचा गृहपाठ घेत होती. गणितामध्ये चुका केल्याबद्दल आईने मुलाला दोन धपाटे घातले. मुलगा रडत झोपी गेला.

प्रसंग २

समा 20 वर्षाची मुलगी आहे. ती आपल्या आई व दोन बहीणींबरोबर गावात राहते. तिचे वडील रेल्वेत नोकरी करतात आणि मुंबईला असतात. ते दर महिन्याला पैसे पाठवायचे. गेल्या एक वर्षापासून हे पैसे येणे अनियमित होत गेले आणि आता तर 6 महिन्यांपासून एकही पैसा त्यांनी पाठवला नाही. शेवटी आई व मुली मुंबईला आल्या. वडीलांना इथे रेल्वेचं क्वॉर्टस असल्याने ते सर्व तिथे रहायला लागले. समाचे वडील आई व मुलींना एक ही पैसा देत नाहीत.

स्वयंपाक घरांतील सर्व वस्तू कुलूपात असतात. किती अन्न शिजवायचं. शिजवायचं की नाही हे तेच ठरवतात. दिवसेंदिवस घरात काहीच शिजत नाही. वडीलांचा एका बाईबरोबर संबंध आहे आणि ते पुष्कळदा तिच्याकडेच राहतात. घरी असले तर आईवर आरडा ओरडा करतात व बेदम मारतात. मागच्या एका महिन्यात समा तीनदा आपल्या आईला हॉस्पिटलला घेवून आली. तिला हा सर्व प्रकार बघवत नाही. परवा तिने बेगॉन घेतले.

प्रसंग ३

शोभा 30 वर्षाची विवाहित स्त्री आहे. तिला 2 मुली व 1 मुलगा आहे. ती शिक्षिका आहे. तिचा नवरा रमेश कंपनीत काम करतो. रमेश आळशी व कामचोर आहे. कामावर त्याचे लक्ष नसते. गप्पा गोष्टी करण्यात त्याचा जास्त वेळ जातो. त्याच्या अशा वागण्यामुळे त्याला सतत वरिष्ठांच्या शिव्या ऐकाव्या लागतात. त्या दिवशी सुद्धा तसेच झाले आणि त्याला सगळयांसमोरच त्याच्या बॉसने सांगितले की जर त्याने लक्षपूर्वक काम नाही केले तर त्याला नोकरीवरुन काढण्यात येईल. रमेश घरी आला तर त्याच्या वडीलांनी विचारले की त्यानी त्यांचे पेन्शनचे काम केले का ? रमेशने ते केले नव्हते. वडील चिडले व त्याला खूप बोलले. रमेशला सांगायचे होते की ते कागद जमा करायची तारीख पुढे ढकलली आहे. जेवत असतांना त्याला भाजीत मीठ नसल्याचे लक्षात आले आणि त्याला खूप राग आला. तो शोभाला खूप बोलला व मारहाण केली. रात्री शोभाला जवळ येवून म्हणाला की माझे चुकले, पण दिवसभराच्या मनस्थापामुळे स्वतःवर ताबा राहिला नाही आणि म्हणून त्याचा हात उठला. शोभा काहीच बोलली नाही कारण हे असे घडतच असतं आणि तिचे अंग खूप दुखत होतं. तिची इच्छा नसताना सुद्धा रमेशने तिच्या बरोबर शारीरिक संबंध ठेवला.

गट चर्चेचा सारांश सादर करताना हिंसेच्या प्रकारांकडे लक्ष वेधावे. नात्यामधील सत्तेचा समतोल, बलाबल तसेच अधिकाराच्या उतरंडीच्या परीणामांचे विश्लेषण करावे.

वरील चर्चेमधून हे स्पष्ट होते की हिंसा अनेक प्रकारची असते. जसे –

1. शारीरिक हिंसा – यामध्ये ढकलणे, चिमटे काढणे, थोबाडित मारणे, चावणे, लाथा मारणे, गळा दाबणे अशा, प्रकारची हिंसा येते. वस्तू फेकणे, कधी हत्यारांचा वापर करणे याच प्रकारात मोडते. याने कधी कधी गंभीर इजा होते.

2. लैंगिक हिंसा – आपल्या जोडीदाराची इच्छा नसताना कोणत्याही लैंगिक इच्छा तिच्यावर लादणे ही लैंगिक हिंसाच आहे.

3. मानसिक हिंसा – टोचून, घालून, पाडून बोलणे. मनाला त्रास होईल अशा गोष्टी करणे. चारित्र्यावर संशय घेणे. जीव देण्याचा / घेण्याच्या धमक्या. सर्व सामाजिक संपर्कापासून एकटे पाडणे, नातेवाइकांना धमक्या देणे. यासारखे सर्व प्रकार मानसिक हिंसेचे आहेत.

4. आर्थिक हिंसा – स्वखर्चासाठी पैसे न मिळणे. घरच्या कोणत्याही उत्पन्नावर हक्क नसणे. आर्थिक निर्णयापासून दूर ठेवणे.

आता दुसऱ्या प्रश्नाकडे वळु, हिंसा कोणी कोणावर केली?

ज दुर्बल, कमजोर, लहान व कनिष्ठ आहेत त्यांच्यावर हिंसा होते. हिंसा करणारा नेहमीच अनेक अर्थाने ताकदवान असतो. कामगार मालकाच्या थोबाडित सहसा मारत नाही, उलटे चित्र अनेकदा घडते. गट चर्चेतील उदाहरणांमध्ये पाहिल्याप्रमाणे, नव–याने बायकोला व आईने मुलाला मारले आहे. सत्ता स्थानाला महत्व आहे. बाई व मुलाच्या हक्कांची पायमल्ली झाली.

असेच का होते ? कारण प्रथेप्रमाणे पुरुषाकडे जास्त सत्ता आहे. त्यामुळे बाईची अवस्था दुबळी होते, बाईचे स्थान दुबळे करणाऱ्या पुढील गोष्टी तुम्हां सर्वांना माहितच आहेत. वडिलांचेच नाव पुढे चालवले जाते. वाढवताना मुलांची तयारी नोकरी करुन कुटुंबाचा पोषणकर्ता होण्यासाठी तर मुलींची तयारी घरकाम करण्यासाठी केली जाते. बाईला संपत्तीत समान वाटा नसतो, तिने केलेले घरकाम विनामोबदला असते.

त्यासाठी अनेक रुढी, प्रथा, रीती–रिवाज व संकेत यातून स्त्री–पुरुषाच्या भूमिका चाकोरीबध्द बनतात आणि अशी व्यवस्था टिकून राहाते, उदाहरणार्थ लग्न झाल्यावर मुलीलाच मुलाच्या घरी नांदायला जावे लागते. नव–याला उदंड आयुष्य मिळावे म्हणून अनेक त–हेचे उपवास करते.

लग्न व्हायच्या आधी योग्य पति मिळावा म्हणून उपवास करतात. उलटे कधी होताना दिसत नाही. सती बाईलाच घालवतात. उलटे उदाहरण कल्पनेतही आणणे जड जाते! आपणा सर्वांमध्ये असे दंडक व विचार खोलवर रुजलेले असतात, पुरुषसत्ता म्हणजे कुटुंबातील पुरुषांचे वर्चस्व. त्यांच्याकडे आर्थिक नाडया असतात. तेच सर्व महत्वाचे निर्णय घेतात, यातूनच इतर सर्व सदस्यांवर नियंत्रण ठेवले जाते.

सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक परंपरातून पुरुषसत्ता कायम टिकवली जाते, स्त्रीला या परंपराचे प्रतीक म्हणून पाहीले जाते. ती वाहक बनविली जाते. स्त्रियांच्या पोषाखावर एक साधी नजर टाकली, तरी त्या कोणत्या जात अथवा धर्माच्या हे लक्षात येते, असे भेद पुरूषांच्या पेहरावरून करता येत नाहीत, असे फरक लहानपणापासून अधोरेखीत केले जातात, वागण्याच्या पद्धतीचे मापदंडही मुलांना व मुलींना वेगळे असतात, दुपटयात गुंडाळलेले नवजात तान्हे बाळ मुलगा आहे की मुलगी हे कळत नाही, सूर्यप्रकाश मुलगा व मुलगी असा भेदभाव करतो का? किंवा इतरही पंचमहाभूते म्हणजे निसर्गशक्ति असा भेदभाव करत नाही, भेद तर फक्त जीवशास्त्रीय लिंगभेदात आहे जो परस्परावलंबी आहे. मग भेदाभेद कशात आहे? तो तर आपल्या संस्कारात, मुलांना वाढविण्यात, चूक–बरोबरच्या संकल्पनांत आहे, आपल्या सर्वसंमत सामाजिकतेत आहे. मुलगा व मुलगी असे परस्पर विरोधी मापदंड जन्मापासूनच लावले जातात. याचेच परिवर्तन स्त्री व पुरूषांच्या वेगवेगळया सत्ता–स्थानात होते, बाळाला स्त्री जन्म देते, म्हणून वडिलांचे त्या नवजातावर कमी का प्रेम असते. तरीही सर्व हळुवार भावना फक्त स्त्री बरोबरच का जोडल्या जातात? पुरूष मोकळेपणाने रडू शकतो का? जर एखादा नवरा आपल्या बायकोला मदत करत असेल, तर अशा पुरूषाबद्दल कसे बोलले जाते? त्याला आपण बाईल्या म्हणून हिणवतो ना? त्याने आपले माणूसपण नाकारून पुरूषीपण सिद्ध करत राहण्याचा दुराग्रहच त्यापाठी नसतो का? थोडा विचार केला तर लक्षात येइल की, पुरूषसत्ताकता स्त्री व पुरूष दोघांनाही त्यांचे माणूसपण नाकारते. स्वयंपाक करणे हे बाईचे काम समजले जाते, पण त्याचा व्यवसाय झाला, की ते पुरूषाचे बनते. केटरिंग कॉलेजचे शिक्षण मुलगे घेतात. सर्वातून एक गोष्ट स्पष्ट होते, लिंगभेदावर आधारित भूमिका तयार होतात. घरातील काम स्त्रियांनी व बाहेरील काम पुरूषांनी करायची ही व्यवस्था बिनविरोध तयार होते. बाईला सेवाभावी, संयमी, हळुवार होण्यासाठी प्रोत्साहन मिळते. तिने ते आर्जवी वागण्यातून व्यक्त करायचे असते. पुरूषाला उत्तम शिक्षण, खूप व्यायाम, खेळ, दांडगाई करण्याचे प्रोत्साहन मिळते. ते तो आपल्या मनाप्रमाणे निर्णय घेण्यातून व्यक्त करतो. मग बाईच्या हातात सत्ता कधी येते? फक्त कदाचित ती सासू झाल्यावर–मुलग्याची आई झाल्यावर या अधिकाराचा वापर तिने कोणाविरूद्ध करायचा? तर सुनेविरूद्ध. म्हणजे बाईच पुन्हा बळी ठरते.

स्त्री किंवा पुरूष यापैकी कोणाकडूनही हिंसा झाली, तरी त्याचे समर्थन होउच शकत नाही. हिंसा करणे म्हणजे मानवी अधिकारांची पायमल्ली होय. कोणत्याही कारणास्तव हिंसा झाली तरी तो गुन्हाच ठरतो.

काही वेळा सतत होणाऱ्या अन्यायाची प्रतिक्रिया म्हणून हिंसा होते. अशावेळी आधीच्या आयुष्यात कोणता त्रास झाला आहे, याचा विचार करावा लागतो. स्त्रियांच्या बाबतीत अशी हिंसा स्वतःला त्रास देण्यातून व्यक्त होते. कधी ती जेवण नाकारते किंवा आत्महत्येचा प्रयत्न करते, कधी लहानग्यावर राग दाखवते. आता आपण स्त्रियांच्या बाबतीत कोणकोणत्या प्रकारची हिंसा होते याची यादी करूया. सर्वांनी आपल्याला माहीत असलेली उदाहरणं देवूया. (प्रशिक्षण देणाऱ्याने याची यादी बनवताना घरातील व घराबाहेरील हिंसा अशी गटवारी करावी – मात्र फळ्यावर अशी गटवारी नोंद करू नये)

जर आपण यादीवर नजर टाकली तर घरांतील हिंसेचे प्रकार जास्त दिसतात. घर वास्तविक सुरक्षा मिळविण्यासाठी उभी केलेली जागा आहे. पण तिथेच स्त्री सर्वात असुरक्षित आहे. ही गोष्ट आपल्याला मान्य करावीच लागेल. शिवाय, घरातील हिंसा कोठेही आणि कधीही होउ शकते. जो पुरूष दारूच्या नशेत आपल्या बायकोवर हात टाकतो, तो नशा नसतानाही तसे करण्याची शक्यता आहे. व्यसनामुळे मारझोड होते असे म्हणणे व्यर्थ आहे. तसेच कौटुंबिक हिंसा वर्ग, जात, धर्म, देश, भाषा, वंश, वर्ण, शहरी–ग्रामीण आणि शिक्षित–अशिक्षित असे भेद मानत नाही. ती कोठेही होते. मारझोड आर्थिक दुर्बल घटकात होते असे सर्वसाधारणपणे मानले जाते. पण हिंसा प्रत्येक वर्गात होते. फक्त त्याची रूपं बदलतात.

स्त्रिया आयुष्याच्या प्रत्येक अवस्थेत हिंसेला तोंड देतात जसे–

1. जन्मापूर्वी:

   प्रसूतीपूर्व गर्भजल परिक्षा करून स्त्री गर्भ असेल तर गर्भपात केला जातो. हे सर्रास घडते. 2001 च्या जनगणने नुसार 6 वर्षाखालील बालिकांची संख्या बालकांच्या तुलनेत घटत चालली आहे.

2. बालपण:

   घरामध्ये मुलीला व मुलग्यांना दिल्या जाणाऱ्या पोषणाच्या हिश्यामधेही तफावत आढळते आई मुलीला भावासाठी व्यवस्थित जेवण काढून ठेवायला सहज सांगते. मुलाच्या शिक्षणाला मुलीच्या शिक्षणाच्या तुलनेत जास्त महत्व दिलं जातं. जर मुलांना परदेशी शिक्षणाला धाडायचे जमत

असेल, तर कोणाला– मुलीला – का – मुलाला अग्रकम दिला जातो? अर्थात मुलाला. आर्थिक चणचणीमुळे एखादयाला उच्चशिक्षण थांबवावे लागते-- त्यात मुलाचा का मुलीचा नंबर लागतो? अर्थात मुलीचा, व्यक्तिमत्व विकासासाठी– गाणं, खेळ, वाचनालय, चित्रकला अशांसाठी अग्रकम अर्थात् मुलग्यांना मिळतो.

3. किशोरवय:

उशीरापर्यंत घराबाहेर राहायचे नाही असे फर्मान कोणासाठी निघते? मुलींसाठी, मुलग्यांना असे बंधन घातले जात नाही. मुलींसाठी कपडयांचे दंडक असतात. मुलींना आधुनिक तऱ्हेचे कपडे आवडीप्रमाणे व सोयीप्रमाणे वापरता येत नाहीत. मोकळेपणाने वागले, तर तिला त्रास होण्याची भीती दाखविली जाते. याला कोण जबाबदार आहे? परंपरांना सोडून केलेला पेहराव त्या मुलीचा अपमान किंवा छेडछाड करण्याचा परवाना देतात की काय? नेमकी चूक कोठे घडते? कपडयांच्या प्रकारात की बघणाऱ्याच्या नजरेत? बघण्याऱ्यांची दृष्टीच यास कारणीभूत आहे. मुलींना मवाळ, मृदू राहून नमते घेण्याची शिकवण दिली जाते. मुलांना धीट राहून प्रसंगी अरेरावी करण्याची मुभा दिली जाते.

4. वयात आल्यावर:

लग्नाच्या उंबरठ्यावर आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य मुलीला नाकारले जाते. इथेच हिंसेची सुरवात होते. जर तिला न आवडणारे स्थळ असेल तर नाही म्हणण्याचा तिला हक्क किती ठिकाणी असतो? अगदि तथाकथित पुरोगामी मंडळीही मुलाने होकार दिल्यावर व्यावहारिक हिशोब करून मुलीला होकार द्यायला सांगतात. लग्नानंतर अमुक एक पोषाख करण्याचे– जसे साडी– नियम घातले जातात. हुंडयासाठी छळ किंवा मानसिक छळ सर्व थरात होतातच. जर या छळाचा अतिरेक झाला तर कोणाला घर सोडावे लागते? अर्थात बाईलाच! बाईने मिळविलेल्या पैशावरही अधिकार सांगितला जातो. घरातील आर्थिक व्यवहारात तिला सहभागी क्वचितच केले जाते. जर ती नोकरी करत असेल तर तिचा पगार कुटुंबासाठी पूरक मदत म्हणून पाहिला जातो. नोकरीतून तिच्या व्यक्तिमत्वाची वाढ होते, किंवा तिला समाधान मिळते याची खबरही कोणला नसते.

5. मृत्युतसुद्धा:

मृत्युनंतर स्त्रीचा अंत्यसंस्कार करण्याचा अधिकार फक्त पुरूषाला असतो. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर पुरूषावरील अवलंबित्व अधोरेखित केले जाते. लहानपणी वडिल– भाउ, नंतर पती–सासरे, म्हातारपणी मुलगा–जावई यांच्या छायेत तिला वाढावे लागते. स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाला उसंत दिली जात नाही. त्यामुळेही होणाऱ्या हिंसेचा ती प्रतिकार करू शकत नाही.

बहुतेकवेळा छळ करणाऱ्या व्यक्ति कुटुंबातील जवळच्या व्यक्ति असतात. त्यामुळे त्याबद्दल उघडपणे बोलणे गैर समजले जाते. आपल्या घराचा मान राखायला पाहिजे, असे संस्कार लहानपणापासून झालेले असतात. घराच्या सन्मानाला कोणत्याही प्रकारचा धक्का लागू न देण्याची काळजी घेण्याचेही संस्कार असतात. मृत्युपूर्व जबानी देतानाही बायका नवऱ्याचे संरक्षण करतात. रक्षणाऐवजी भक्षण करणाऱ्या कुटुंबाला पाठीशी घालण्याच्या सामाजिक प्रथेलाही प्रश्न विचारायला हवा. कुटुंबाचा सन्मान वगैरे शब्दप्रयोग न करता कुटुंब सदस्यांची सुरक्षा–हक्क असे शब्द प्रयोग करायला हवेत. जर बाईवर बलात्कार झाला असेल तर तिच्या इभ्रतीवर घाला झाला असा विचार न करता तिच्या मानवी हक्कांची पायमल्ली झाली, असे म्हणायला हवे. मूळ दृष्टीकोनात असा बदल झाला, तर चार भिंतीआड होणारे अन्याय कमी होतील, स्त्रिया जास्त सहजतेने अत्याचाराला वाचा फोडतील. त्या हॉस्पीटल, पोलिस स्टेशन, कोर्ट व महिलांच्या संघटना येथे दाद मागायला येतील.

नेहमी एक प्रश्न विचारला जातो, आपण फक्त बायकांच्या विरोधातील हिंसेबद्दलच का बोलतो ?

महिलाही हिंसा करु शकतात, पुरुषही हिंसेचे बळी होतात. कांही बाबतीत असे होउ शकते. पुरुष जर हिंसेचा बळी झाला तर त्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करायला हवा. दिलासामध्ये आपण महिलांच्या विरोधात होणाऱ्या हिंसेबद्दल काम करत आहोत. सर्व प्रथम हे वास्तव लक्षात घ्यायला हवे. महिलांच्या विरोधात होणाऱ्या हिंसेचे प्रमाण पुरुषांवर होणाऱ्या हिंसेच्या तुलनेत खूप मोठे आहे. दुसरे म्हणजे त्याबद्दल बोलणे गैर मानले जाते. परिणामी यावर उपाय योजना करणं अवघड बनते. हिंसेपासून बचाव करावयाचा असेल तर वकील, डॉक्टर किंवा पोलिस अशी मदत घेण्याची कुवत बाईकडे पुरूषांच्या तुलनेत कमी असते. त्यामुळे त्यांना मदत करणे योग्य आहे. स्त्री व पुरूष दोघेही हिंसा करू शकतात हे मान्य आहे. पण हिंसेचे स्त्रिवर तीव्र व दूरगामी परिणाम होतात. महिला नेहमी भीतीच्या सावटाखाली असतात. त्यांना घराबाहेर जाण्याची, मुलांचा ताबा न मिळण्याची, सामाजिक पत जाण्याची, दुसरे लग्न न होण्याची, वडिल–भाउ–नवरे–मुलगे यांच्याकडून संपत्तीच्या वाटणीमधून वगळले जाण्याची, जीवे मारले जाण्याची भीती पुरूषांच्या तुलनेत किती तरी पटीने जास्त असते. जोपर्यंत साधन सामुग्री व संपत्ती पुरूषांच्या हातात आहे तोपर्यंत महिलांवर हिंसा होण्याची शक्यता राहणारच. हा असमतोल असणारी सामाजिक व्यवस्था बदलणे महत्वाचे आहे. असा बदल घडवून आणण्याचा एक मार्ग म्हणजे हिंसा झालेल्या स्त्रिला मदत करणे हिंसेपासून मुक्त जीवन असू शकते असा आत्मविश्वास वाढवणे, हे पहिले पाउल आहे. दिलासामध्ये हे काम करण्याचा आमचा विचार आहे.

भाग तीन - जेवणानंतरः

आरोग्यसेवकाची भूमिकाः

तीन गटात विभागणी करावी. प्रत्येक गटाला एक उदाहरण म्हणून केस द्यावी. चर्चेसाठी पंधरा मिनिटांचा वेळ द्यावा. त्यावर आधारीत प्रात्यक्षिक करून दाखवण्याची कल्पना द्यावी.

1. 22 वर्षाची बाई परस्पर अंग दुखत म्हणून दवाखान्यात येते.
2. 25 वर्षाची लग्न झालेली मुलगी शनिवारी रात्री दिड वाजता ढेकणाचं औषध घेतलं म्हणून दोन माणसांनी आणली.
3. 35 वर्षाची तीन मुलींची आई स्टॉओचा भडका उडाला व जळलेल्या अवस्थेत आणली, बरोबरी दोघी शेजारच्या बायका होत्या.

प्रत्येक गटाने चर्चेनंतर उदाहरणावर आधारित प्रसंग उभा करावा. त्यामधे रूग्ण, त्याचे नातेवाईक–सोबती तसेच आरोग्यसेवक या सर्व पात्रांचा समावेश असावा या प्रात्यक्षिकांचे इतरांनी बारकाव्यांसकट निरीक्षण करावे. प्रत्येक सादरीकरणानंतर सर्वांनी आपली निरीक्षणे मांडावीत व प्रश्न उपस्थित करावे. प्रशिक्षणकर्त्याने यासाठी सर्वांचा सहभाग वाढेल याकडे लक्ष द्यावे. चर्चेतून आरोग्यसेवकाच्या भूमिकेचे मुद्दे अधोरेखीत करावेत.

आपण तीन उदाहरणं पाहिली, या तीन वेगवेगळ्या केसेस असू शकतील. किंवा एकच केस अंग दुखी, वीषबाधा व भाजणे अशी तक्रार घेउन तीन वेगळ्या वेळी आलेली असू शकते. कारण हिंसेचा वेळीच इलाज नाही केला तर ती वाढत जाते. कमी होत नाही. आपण योग्य दक्षता दाखवली तर ती पहिल्याच वेळी थाबंवता येते. या सर्व उदाहरणांमधे रुग्णाच्या शारीरिक तक्रारी बाबत काळजी घेतली गेली, पण मानसिक बाजू लक्षात घेतली गेली नाही. शिवाय, तक्रार नमूद करताना ईजा कशामुळे झाली, कोणी केली असे तपशील विचारले जात नाहीत, खरे तर याच टप्प्यावर वैद्यकीय –कायदा केस केली जाउ शकते. ती आपल्या घरगुती समस्या सांगेल असा भाव बोलण्यामधून पोहचवण्याची काळजी घेतली गेली नव्हती. अशा बायकांच्या बरोबर बऱ्याच वेळा नातेवाईक असतात, ते त्यांची पाठ सोडत नाहीत. बहुदा तिला मारणारे तेच असतात, ती त्यांच्या विरोधात जबाब देण्याची त्यांना भीती असते. बाईलासुध्दा भीती वाटत असते. कारण विरुध्द जबानी देउन तिला त्याच घरी परत जायचे असते. शिवाय, याचा वाईट परिणाम आपल्या जवळच्यांना अथवा मुलांना भोगावा लागेल असेही वाटत असते. अशावेळी आरोग्यसेवकांकडून किंचित आधाराची गरज असते. तिला बोलते करण्यासाठी, ती सांगू शकते असा संदेश तिच्यापर्यंत पोहचवावा लागतो.

एकदा रुग्ण शारीरिक त्रासांपासून थोडासा मुक्त झाला की तिच्याशी हिंसेच्या कारणांबद्दल बोलणे शक्य होईल. कक्षामधे थोडीशी खाजगी जागा मिळविता येते, तिच्या संमतीने कळालेली कारणं संपूर्णपणे खाजगी ठेवली जातील हे सांगावे. त्याचा उपयोग न्याय मिळवताना होउ शकतो हेही सांगावे.

आता आपण कौटुंबिक हिंसेमुळे कोणकोणत्या मानसिक व शारीरिक तक्रारी घेउन स्त्रियां दवाखान्यात येतात यावर एकत्रितपणे सर्व बाजूने विचार करुया.

शारीरिक तक्रारी

हाड मोडणे, ईजा–जखमा, मुकामार, गर्भपात, कायदेशीर गर्भपात, छेडछाडीमुळे तेजाबच्या भाजलेल्या जखमा, बलात्कार, असुरक्षित गर्भारपण, गुप्त रोग, एच. आय. व्ही बाधा, एड्स, बालकाचे जन्म वजन कमी असणे, गर्भपिशवी खाली येणे, पांडुरोग आणि विषबाधा ईत्यादी.

मानसिक तक्रारी

उदासी, आकस्ताळीपणा, भमिष्टपणा, अतीताणा नंतर होणारा आजार, सतत ताणाखाली असणे, कायम काळजीग्रस्त असणे, वास्तवापासून तुटणे, असंबद्ध हालकाची करणे व बोलणे अशा प्रकारच्या अनेक तक्रारी असू शकतात.

अशा स्त्रियांना मदत करण्यासाठी आरोग्यसेवकाचा नेहमीचा दृष्टीकोन बदलावा लागेल. हिंसेचे प्रमाण वाढणार नाही याची काळजी घेता येईल. थोडेसे माणुसकीने बोलले तर दिलासामध्ये काय मदत मिळू शकते, याची माहिती देता येईल.

आरोग्यसेवेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या 'सेहत' या बिगर सरकारी संस्थेबरोबर के. बी. भाभा रुग्णालय, वांद्रे मुंबई महानगरपालीका यांच्या सहकार्याने दिलासा प्रकल्प कार्यरत आहे. स्त्रियांना दिलासा देणे जेणेकरुन त्यांना बोलते करणे हे महत्वाचे काम दिलासा करते, बोलते होणे ही पहिली पायरी आहे. त्या बोलतील असे वातावरण तयार करणे हे सर्वात महत्वाचे काम आहे. त्यानंतर दिलासा मानसिक व सामाजिक आधार देण्याचा प्रयत्न करते. महिलेला काय हवे आहे, हे समजून घेण्यावर भर असायला हवा. आपण तिचे ऐकणे खूप आवश्यक आहे. आपण तिच्या वतीने नाही, तर तिच्या सोबतीने काम करायचे, आपण तिच्या वतीने निर्णय घेणार नाही, तिच्यावर ताशेरे

ओढणार नाही. तिची खाजगी बाब जाहीर करणार नाही. तिचे निर्णय ती घेउ शकते हा आत्मविश्वास तिच्यात निर्माण करावयाचा आहे.

कौटुंबिक हिंसा हा एकट्या दुकट्याने सोडवण्यासारखी समस्या नाही, त्याची कारणे समाजाच्या सर्व घटकांमध्ये आहेत. एकट्या दुकट्या संस्थेचेही ते काम नव्हे. आपल्याला अनेक संस्थांशी संपर्क ठेवायला लागेल. जसे, स्त्रियांसाठी ताबडतोबीची राहण्याची व्यवस्था करु शकण्या-या निवारा संस्था, कायदेशीर सल्याची व्यवस्था, ताबडतोबीचा सल्ला देण्या-या संस्था, तज्ञांकडून सल्ला, या समस्येवर कामं करणा-या संघटना, पोलिस व न्यायालय, परस्पर सहकार्य करुन स्त्रिला लवकरांत लवकर योग्य व चांगली मदत मिळवून देण्याचा प्रयत्न राहील.

सर्वसाधारणपणे दिलासात खालील सेवा दिल्या जातील –

1. भावनिक व मानसिक आधार
2. कायदेशीर सल्ला
3. निवारागृहासाठी शिफारस
4. ताबडतोबीचा 24 तासांसाठी दवाखान्यात निवारा

दिलासा-स्त्री अत्याचार निवारण केंद्र

आरोग्यसेवेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या 'सेहत' या बिगर सरकारी संस्थेबरोबर के.बी. भाभा रुग्णालय, वांद्रे मुंबई महानगरपालिका यांच्या सहकार्याने दिलासा प्रकल्प कार्यरत आहे.

दिलासा हा प्रकल्प सार्वजनिक रुग्णालयात स्थित असून स्त्रियांवरील होणाऱ्या कौटुंबिक हिंसेचे निवारण करणारा प्रकल्प आहे. इथे कौटुंबिक हिंसा पिडित स्त्रियांना सामाजिक आणि मानसिक आधार दिला जातो.

ह्या अतिरिक्त प्रशिक्षण, संशोधन आणि जागरुकता निर्माण करणे, हे दिलासाचे इतर उपक्रम आहेत.

दिलासा-स्त्री अत्याचार निवारण केंद्र

के.बी. भाभा रुग्णालय आणि सेहत यांच्या संयुक्त विद्यमाने

विभाग क्र. 101, अपघात विभागासमोर, के.बी. भाभा रुग्णालय, वांद्रे (प.), मुंबई-400 050.

फोन : 26400229 (डायरेक्ट) • 26422775 • 26422541 एक्स्टेंशन 4376